# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/03/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत १४ कि.मी. अंतरावरील मौजा बाबुळखेडा येथे दिनांक ०१/०३/२०२३ चे १९.०० वा. ते १९.१० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— संगीता सोमेश्वर नेहारे, वय २० वर्ष, रा. बाबुलखेडा ता. कामठी व आरोपी नामे— सोमेश्वर नेहारे, रा. बाभूळखेडा कामठी हे पती पत्नी असुन आरोपीने फिर्यादीला तू स्वयंपाक उशिरा का केला या कारणावरून शिवीगाळ करून दोन थापडा मारल्या व मुलीच्या हातात असलेला लाकडी बेलन घेऊन डोक्यावर मारून जखमी केले व तू पोलिसात तक्रार केली तर तुला पुन्हा मारीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ४७८ मनोहर राउत मो. क्र. ८५५४९६७९४० हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत राहते घरी कावरापेठ उमरेड येथे दिनांक ०१/०३/२०२३ चे २१.१५ वा. दरम्यान यातील **मृतक नामे— पंढरी केशव कांबळे (मृतक), वय २२ वर्ष, रा. जैतपुर ता. लाखांदुर जि. भंडारा** याचे लग्न सन २०१७ मध्ये सौ. वंदना हिचे सोबत झाले असून त्यास ६ वर्षाची मुलगी आहे. यातील मृतक हा दारु पिण्याचे सवयीचा असल्याने त्याची पत्नी मागील १ वर्षापासून सोडून गेल्यामुळे तो नेहमी तनावात राहत होता व त्याला जास्त दारुचे व्यसन लागल्याने दारुचे नशेत स्वत:चे घराचे हॉलमधील फॅनला काळया रंगाच्या दुपट्ट्याने गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अशिष माधवराव पाठक, रा. कावरापेठ उमरेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ७८२ मनोज वाघ मो. नं. ९८२२८५२५०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर